८९३८

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २४७/बैठक/३० जुन/२०२३/९७१८ दिनांक : 14/7/23

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक ३० जुन, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७०व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब मा. सदस्य यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले. डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी ईमेलद्वारे अनुपस्थितीबाबत कळविले असल्याने त्यांच्या अनुपस्थितीबाबत नोंद घेण्यात आली.

डॉ. उत्तम सोनाजी कदम, संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, डॉ. सुनिल लिलानी, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, आणि श्री. सिध्देश नर, परीक्षा समन्वयक, वैद्यकीय व आयुष शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६९ व्या (दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३, २८/०२/२०२३, २८/०३/२०२३, २७/०४/२०२३ व ३१/०५/२०२३) बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३, २८/०२/२०२३, २८/०३/२०२३, २७/०४/२०२३ व ३१/०५/२०२३ रोजीच्या क्रमांक ६९व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले, तथापि दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ६(ग) मधील परिच्छेद क्रमांक (४) मधील तालिकेमध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या | संचालनालयाने प्रवेश मान्यते करिता शिफारस केलेल्या व प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग | ५० | ५० | ५० |
| २. | कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे | ७५ | ७१ | ७१ |

सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ६९ च्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | -- | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ६९ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व मा. सदस्य, शासनाचे संबंधित विभाग व संचालनालये यांना कळविण्याबाबत. | प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३, २८/०२/२०२३, २८/०३/२०२३, २७/०४/२०२३ व ३१/०५/२०२३ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना वेळोवेळी स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २. | ३१/०१/२०२३ ४(ख) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील त्रुटी अभावी ना मंजुर करण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राप्त पुनर्विलोकन याचिकेच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक २/१२/२०२२, ३/१२/२०२२ व १६/१२/२०२२ झालेल्या सुनावणी व तद्नुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सुनावणी आदेशाचा तपशील प्राधिकरणास सादर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सर्व प्रकरणे संबंधित संचालकांना पुनश्च पडताळणीकरिता पाठविण्यात आलेली आहेत, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. |
| ३. | ३१/०१/२०२३ ४(छ) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे येथे विधी ५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु.श्रावणी संदेश दळवी या विद्यार्थिनीच्या अंतिम प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २१/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ४. | ३१/०१/२०२३ ४(ट) व २७/०४/२०२३ ३ (च) व ३१/०५/२०२३ ६ (ज) | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्था यांमध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्याच्या कार्यपध्दती (SoP) प्राधिकरणास अवगत करण्याचे निर्देश. | प्रस्तूत प्रकरणी कार्यपध्दती (SoP) प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आली. त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. **(प्रपत्र-क)** |
| ५. | ३१/०१/२०२३ ४(ण) | क्रिएटिव्ह एंटरप्रायझेस यांच्यामार्फत हाऊसकिपींग सर्व्हिसेसच्या कामासाठी प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांची सफाईगार या पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत. | नियुक्ती कार्यादेश निर्गमित केले आहेत. |
| ६. | १४/०२/२०२३ (१) | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. समृध्दी थोरात यांच्या प्रवेश प्रकरणी आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांचा दिनांक ७/०२/२०२३ रोजीच्या अहवालास अनुसरुन. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ७. | २८/०२/२०२३ १(८) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत<br>निर्णय :-<br>*"८) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले."* | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात येत आहे. |
| ८. | २८/०२/२०२३ १(९) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास PWD संवर्गातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याबाबत | प्रस्तूत प्रकरणी कार्यवाही सुरु आहे, पुढील बैठकीमध्ये अहवाल सादर करण्यात येईल. |
| ९. | २८/०२/२०२३ २ | शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर केलेले नाही, अशा प्रकरणी दिनांक १४, १५, १६, २१ व २२ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या बैठकीस अनुसरुन निर्णय घेणे. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत. |
| १०. | २८/०२/२०२३ ३ (क) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सेवा पुरवठादार निश्चित करुन ई-निविदा प्रक्रियेत सामाईक प्रवेश परीक्षेसाठी रु.४९५/- व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी रु.३७५/- या प्रमाणे खुल्या स्पर्धात्मक ई-निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त दरास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे कार्यवाही करण्यात येत असून प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत अहवाल सादर करण्यात येईल. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ११. | २८/०२/२०२३ ३ (ख) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये करिता नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवापुरवठादारांच्या समवेत करण्यात येणाऱ्या सामंजस्य कराराची व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता सामाईक प्रवेश परीक्षांची माहितीपुस्तिका-प्रवेश नियमावली प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्य यांना पाठविण्यात यावी. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे कार्यवाही करण्यात येत असून प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत अहवाल सादर करण्यात येईल. |
| १२. | २८/०२/२०२३ ३(ग) | प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक ०४/०५/२०२३ व २४/०३/२०२३ रोजीचे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. |
| १३. | २८/०२/२०२३ ३(घ) | याचिका क्रमांक ६३५१/२०२२ मधील दिनांक ७/०२/२०२३ रोजीचे न्यायालयीन आदेश - व्ही.एस.पी.एम. चे कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. रिगनाथे श्रध्दा तनगिर यांच्या प्रवेश प्रकरणी | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केली आहे. |
| १४. | २८/०२/२०२३ ३(ड) | याचिका क्रमांक ५११६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीचे न्यायालयीन आदेश - महात्मा गांधी कॉलेज ऑफ नर्सिंग, वर्धा येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. प्राची अमोल पराये यांच्या प्रवेश प्रकरणी. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केलेली नाही. |
| १५. | २८/०२/२०२३ ३(च) | याचिका क्रमांक ५०५६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीचे न्यायालयीन आदेश - सेंट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जामरे राजेश्वरी कालीराम यांच्या प्रवेश प्रकरणी. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केलेली नाही. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १६. | २८/०२/२०२३ ३(छ) | ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केली आहे. |
| १७. | २८/०२/२०२३ ३(ज) | महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय, नवी मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केलेली नाही. |
| १८. | २८/०२/२०२३ ३(झ) | श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जागृती तेलवाने यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केलेली आहे. |
| १९. | २८/०३/२०२३ १ (६) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १. Hilly Area, २. PWD, ३.Defence, ४.MKB, ५. Orphan, ६. अनिवासी भारतीय कोट्यातील रिक्त जागांवर व ७. व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्यासाठी प्राधिकरणाचे मा. सदस्य, डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी गठित उपसमितीने तपासणी/छाननी करुन स्वयंस्पष्ट अहवाल ०२ महिन्यांमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक रोजीच्या पत्राने गठित उपसमितीचे आदेश निर्गमित करण्यात आले. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २०. | २८/०३/२०२३ (२) | मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ३(घ) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (२०१७-१८ मधील ०२ एल.एल.बी. अभ्यासक्रमाची प्रकरणे) मध्ये ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणास विलंबाने सादर केल्याप्रकरणी दंड आकारण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी दिनांक १६ व १७ मार्च २०२३ रोजी झालेल्या बैठकीस अनुसरुन निर्णय घेणे. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत. |
| २१. | २८/०३/२०२३ ३(क) | के.जे. सौमय्या मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटर, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष पदवी व्यावसायिक वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जैस्वार वंदना रामनवल यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे, मुंबई खंडपीठ, मुंबई येथील याचिका क्रमांक ५६८/२०२२ मधील दिनांक ९/०१/२०२३ रोजीचे न्यायालयीन आदेश. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ०८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २२. | २८/०३/२०२३ ३(ख) | पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दानिश अनवर अबरार अहमद या विद्यार्थ्याने दाखल केलेली याचिका क्र.२०१६/२०२२ मधील मा.न्यायालयाचे आदेश | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २०/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २३. | २८/०३/२०२३ ३ (ग) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमास (MBA) इतर सामाईक प्रवेश परीक्षांद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २५/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २४. | २८/०३/२०२३ ३(घ) | श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे या अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २५. | २८/०३/२०२३ ३(ड) | दयानंद लॉ कॉलेज, सोलापुर येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २१/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २६. | २८/०३/२०२३<br>३ (च) | महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या ०८ व ०९ मजला खरेदीच्या उर्वरित रक्कम ०२ कोटी मधील प्रत्येकी रु.७५ लाख असे मिळून रु.०१ कोटी ५० लाख प्रदान करण्यास मान्यता दिली. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या गोपनीय कामकाजासाठी अतिरिक्त जागेची आवश्यकता असलयामुळे या कार्यालयाच्या ईमारतीमधील रिक्त असलेल्या जागा भाडेतत्वावर घेण्याबाबत सविस्तर अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत असून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात येईल. |
| २७. | २८/०३/२०२३<br>३(छ) | नुरजहाँ बेगम सलाम एहमद वुमन्स कॉलेज ऑफ लॉ, बुरांडा, ता. - मोरगाव, जिल्हा - यवतमाळ येथील शैक्षणिक वष्र २०२२-२३ मधील व्यावसायिक विधी-५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित ०९ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ०८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br><br>प्रस्तूत प्रकरणी संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचा अहवाल अप्राप्त आहे. |
| २८. | २८/०३/२०२३<br>३(ज) | महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित कु. यश प्रशांत पालवे यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २९. | २८/०३/२०२३<br>३(झ)<br>व<br>२७/०४/२०२३<br>१(७) | विवा कॉलेज ऑफ फार्मसी, विरार, जिल्हा - ठाणे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कु. आदिती अनिल मोरे यांचा प्रथम वर्ष बी. फार्म. अभ्यासक्रमाच्या प्रवेश रद्द बाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३०. | २७/०४/२०२३<br>२ | प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सामाईक प्रवेश परीक्षा/ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात श्री. भोसले समितीच्या अहवालातील शिफारशीनूसार मानधन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानूसार दोन्ही विभागांनी कार्यवाही करावी. | या निर्णयाच्या अनुषंगाने दोन्ही विभागांकडील कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.<br><br>(जे. पी. डांगे)<br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण,<br>महाराष्ट्र राज्य |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३१. | २७/०४/२०२३ ३(क) | श्री. साई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, परदरी, औरंगाबाद या संस्थेतील थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबत तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दिनांक ९/१/२०२३ रोजीचे पत्र. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३२. | २७/०४/२०२३ ३(ख) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण विभगाअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयुष संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेले दिनांक ३०/०१/२०२३ व २८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले अहवाल. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ०६/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३३. | २७/०४/२०२३ ३(ङ) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षे दरम्यान उद्भवलेल्या अडचणींबाबत. | प्राधिकरणाच्या निदे्शानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| ३४. | २७/०४/२०२३ ३(झ) | ॲड. बाळासाहेब आपटे कॉलेज ऑफ लॉ, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी -३ व विधी - ५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २८/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३५. | ३१/०५/२०२३ १(५ व ६) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे अहवाल सादर करण्याबाबत प्राधिकरणाचे निर्देश | प्राधिकरणाचे निर्देश संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालनालय, आयुष शिक्षण, मुंबई यांना दिनांक २६/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३६. | ३१/०५/२०२३ (२) | बॅ. नाथ पै. कॉलेज ऑफ नर्सिंग, कुडाळ, सिंधुदूर्ग यांनी दिनांक २७/०४/२०२३ व ०८/०५/२०२३ रोजींच्या पत्रान्वये कु. भारती यशवंत गोसावी यांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्याक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आकरण्यात आलेल्या दंडाची रक्क्म क्षमापित करण्याबाबतच्या पत्रावर निर्णय घेणे. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३७. | ३१/०५/२०२३ (३) | इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी, पुणे या संस्थेतील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना संस्थास्तरावर दिलेल्या अतिरिक्त प्रवेशाबाबत तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे दिनांक १९/१२/२०२२ व १६/०५/२०२३ रोजींच्या पत्रावर निर्णय घेणे. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ३८. | ३१/०५/२०२३ (४) व (५) | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १९ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे वार्षिक अहवाल अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर. | या संदर्भात प्रक्रिया सुरु आहे. सविस्तर तपशील पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. |
| ३९. | ३१/०५/२०२३ ६(क) | संत तुकाराम विधी महाविद्यालय, उदगीर या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ४०. | ३१/०५/२०२३ ६(ख) | मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. १०३३१/२०२२ मधील दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या आदेशानुसार सेट. फ्रांन्सिस ईन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, मुंबई या महाविद्यालयातील प्रवेशित कु. शेख मोह. साहिल सलीम यांच्या प्रवेश मान्यतेबाबत | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ४१. | ३१/०५/२०२३ ६(ग) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदुर्ग व कर्मवीर व्यं. ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्रस्तूत प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात येईल. |
| ४२. | ३१/०५/२०२३ ६ (घ) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष बी. एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशाबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीपुस्तिकेतील प्रपत्र- Q मध्ये सोबतच्या प्रपत्राचा (प्रपत्र-क) समावेश करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच सदरील माहितीपुस्तिका सीईटी कक्षामार्फत प्राधिकरणाच्या मा. सदस्यांना अवगत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. | या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत असून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात येईल. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४३. | ३१/०५/२०२३ ६(छ) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या पुन:श्च पडताळबणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक ०९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ४४. | ३१/०५/२०२३ ६ (झ) | महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई यांचे मालकीची न्यु एक्सलसियर इमारतीतील ०५ व्या मजलावरील जागा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या गोपनीय कामकाजासाठी भाडेतत्वावर घेण्यास प्राधिकरणाने मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि, सदरील प्रक्रिया शासनाच्या विहित पद्धतीनुसार पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. | या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत असून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात येईल. |

१) वरील तालिकेतील अ.क्र. (१२) - प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ विषय सूची क्रमांक ३(ग) मधील निर्णयास अनुसरुन प्राधिकरण व सीईटी कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन व सेवा पुढे चालु ठेवण्याबाबत कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, तथापि, प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाच्या लेखा विभागातील निव्वळ कंत्राटी तत्वावर वर्ग - ३ मधील कार्यरत श्रीमती सुश्मा घाडी, लिपिक व श्रीमती अनिता काळुखे, लिपिक या दिनांक ३१/०३/२०२३ रोजी पासून कार्यालयामध्ये गैरहजर आहेत, या संदर्भात त्यांना वारंवार दूरध्वनी व दिनांक ११/०५/२०२३ रोजीच्या ईमेलद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांच्याकडून या संदर्भात अद्याप काहीही प्रतिसाद देण्यात आलेला नाही, ही बाब सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केली. तसेच अपुऱ्या कर्मचारीवृंदामध्ये प्राधिकरण कार्यालयातील नियमित कामकाज विहित कालावधीमध्ये सुरळीतपणे पार पाडणे जिकरीचे होत असल्याचे कळविण्यात आले.

उक्त नमूद बाबी विचारात घेता श्रीमती सुषमा घाडी, लिपिक व श्रीमती अनिता काळुखे, लिपिक यांना दिनांक ११/०५/२०२३ रोजीच्या ईमेलद्वारे कळविल्यानंतर सुद्धा या कर्मचाऱ्यांनी काहीही प्रतिसाद न दिल्याने त्यांना या नोकरीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. या कारणास्तव संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक ०१/०४/२०२३ रोजी पासून समाप्त करण्याचा प्राधिकरण निर्णय घेत आहे. प्राधिकरण कार्यालयाकरिता आवश्यक असणारा कर्मचारी वृंद प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ३(ग) मधील निर्देशानुसार कार्यवाही करावी.

२) तसेच उक्त तालिकेतील अ.क्र. ४ मधील प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(ट) अन्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्था यांमध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्याच्या कार्यपध्दती (SoP) प्राधिकरणास सादर करण्यात आली, त्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ३: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बैठक क्र. ६९व्या (दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या) बैठकी नंतर प्राप्त झालेल्या तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेण्याबाबत.**

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण, तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकी नंतर प्राप्त झालेल्या तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या तपासणी/पडताळणी अहवालांचे अवलोकन करण्यात आले.

अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर करताना उल्लंघन केले आहे, अशा महाविद्यालयांना समज देण्यात यावी.

२) वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १(५) मधील निर्देशास अनुसरुन संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक २७/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा मंजुर करण्यात आला असून संचालनालयांमार्फत सादर करण्यात आलेले व प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीतील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रस्ताव मान्य करण्यात येत आहेत.

तसेच आरोग्य विज्ञान व आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ५) अनिवासी भारतीय (एनआरआय) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया इ. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी करण्याप्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननीची कार्यवाही करावी. या प्रक्रियेमध्ये उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णयाकरिता प्राधिकरणापुढे ठेवावे.

३) प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम **(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)** प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

४) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

प्रवेश प्रक्रियेनंतर ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर रद्द करण्यात आले आहेत, अशा प्रवेशांबाबत महाविद्यालयांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी संबंधित सेवा पुरवठादार यांच्यामार्फत उचित कार्यवाही करावी.

तसेच संचालकांनी सादर केलेल्या अहवालामध्ये व सीईटी कक्षाच्या प्राप्त माहितीनुसार (Database मध्ये) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये फरक/बदल असल्यास संबंधित सेवापुरठादार यांनी संचालकांच्या अहवालानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तपासून संबंधित परिक्षा समन्वयक यांच्या परवानगी प्राधिकरणाच्या पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांचा तपशील अद्यावत करण्यासंबंधी उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

५) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

६) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी, तथापि ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी १% निवडक पध्दतीने प्राधिकरण स्तरावर तपासणी/छाननी प्रक्रिया पुर्ण झालेली नाही, अशा अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांना संबंधीत उपसमितीद्वारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयांनतर प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील.

७. अधिनियम २०१५ च्या तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्तया प्रस्ताव विहित कालावधीत प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांना कायद्यातील तरतुदीनुसार समज देण्यात यावी.

८. प्रवेश बंद दिनांकानंतर ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर रद्द करण्यात आले आहेत. अशा प्रवेशांबाबत महाविद्यालयाकडून सुस्पष्ट खुलासा मागविण्यात यावा.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ख) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुन:श्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत,-</u>

१) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे दिनांक १५/०२/२०२३, १२/०४/२०२३ व १/०६/२०२३ रोजीचे अहवाल.

२) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सादर केलेल्या दिनांक ५/१२/२०२२ व ९/१२/२०२२ रोजीचे अहवाल.

३) कला संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेला दिनांक २/०२/२०२३ रोजीचा अहवाल

४) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.

५) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, ज्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालकांनी त्रुटी दर्शविली अशा प्रकरणांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) अन्वये त्रुटी असलेल्या प्रवेश प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश होते.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ना मंजुर असलेल्या (प्रलंबित प्रकरणी) प्रवेशांबाबत त्वरीत निपटारा होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुन:श्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित संचालकांनी पुनश्च पडताळणी करुन अहवाल प्राधिकरणास सादर केलेले आहेत.

सविस्तर चर्चेनंतर, उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या खालील अहवालांचे अवलोकन करण्यात आले,-

१) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे दिनांक १५/०२/२०२३, १२/०४/२०२३ व १/०६/२०२३ रोजीचे अहवाल.

२) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सादर केलेल्या दिनांक ५/१२/२०२२ व ९/१२/२०२२ रोजीचे अहवाल.

३) कला संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेला दिनांक २/०२/२०२३ रोजीचा अहवाल

४) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.

५) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

वरील प्रमाणे नमूद सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ज्या प्रवेश प्रकरणी संचालनालयाचा अहवालानुसार व प्रवेश नियमानुसार पात्र आहे, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (प्रपत्र-ब ). तथापि या संदर्भांत संबंधित सर्व संचालकांनी (आयुष संचालनालयासह) सादर केलेल्या अहवालानुसार उर्वरित प्रवेश अपात्र केलेले असल्याने अमान्य करण्यात येत आहेत. तद्नुषंगाने सर्व संबंधितांनी उचित कार्यवाही करावी.

एकूण पुनर्विलोकन याचिकां प्रकरणी मान्यता देण्यात आलेल्या प्रकरणांचा घोषवारा खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | विभाग | मान्यता प्रदान करण्यात आलेली प्रकरणे (विद्यार्थी संख्या) |
|---|---|---|
| १. | तंत्र शिक्षण | २१९ (१०३०) |
| २. | उच्च शिक्षण | २४ (१४३) |
| ३. | वैद्यकीय शिक्षण | ३३ (४३) |
| ४. | कला शिक्षण | ५ (१८) |
| ५. | कृषी शिक्षण | ६ (९) |

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबतचा तपशील.</u>

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सविस्तर माहिती प्राधिकरणास अवगत केली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई व २) संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची

(जे.पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १४/7/23